N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** अहेरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0275 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/08/2023 07:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 18/08/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/08/2023

**Time From (वेळेपासून):** 15:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/08/2023 **Time (वेळ):** 07:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 009

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/08/2023 07:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, पंचायत समिती अहेरीचे समोर ,अहेरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सोईल अजीजखा पठाण
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बोरी,अहेरी,अहेरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बोरी,अहेरी,अहेरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9579284578

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रतिक दिवाकर चन्नावार | | | 1. पंचायत समिती अहेरी ,अहेरी , अहेरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजिव येल्ला कोठारी | | | 1. पंचायत समिती अहेरी ,अहेरी , अहेरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 3 | अनिल बुधाजी गोवर्धन | | | 1. व्यंकटापूर ,अहेरी,अहेरी, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | परवाना | तेंदुपत्ता वाहतुक परवाना नाहरकत प्रमाणपत्र | 0.00 |
| 2 | वाहने आणि इतर | मोटर साइकल | हिरोहोंडा स्प्लेंडर जुनी वापरती MH34BC6480 | 20,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु. दराच्या 260 नोटा असे एकुण 1,30,000/ | 130,000.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | सनडीक्स कंपनीची 32 जीबी ची 04मेमरी कार्ड | 0.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | लॅपटॉप बॅग | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

150,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

लेखी फिर्याद दिनांक 26/08/2023नांव:- सोईल अजीजखॉ पठाण, वय 35 वर्षे, व्यवसाय- तेंदूपत्ता ठेकेदारी मु. पो. बोरी ता. अहेरी जि. गडचिरोली मो.क्र. 9579284578मी दिनांक 18/08/2023 रोजी श्री श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांचे समक्ष फॉरेस्ट रेस्ट हाउस आलापल्ली जि. गडचिरोली येथे लोकसेवकां विरुद्ध लाच मागणी संबंधाने सहीनिशी लेखी तक्रार दिली. मी दिलेली लेखी तक्रार खालीलप्रमाणे आहे.मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली कॅम्प आलापल्ली येथे आज दिनांक 18/08/2023 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असून सन 2021 पासून तेंदूपत्ता ठेकेदारीचे कामे करतो. मी सन 2022 मध्ये ग्रामपंचायत उमानूर, गोविंदगाव, पेठा येथील तेंदूपत्ता युनिट लिलावात घेतलेले होते. त्यापैकी ग्रामपंचायत पेठा व गोविंदगाव या युनिटमधील तेंदूपत्ताची मजुरी व रॉयल्टीची रक्कम पुर्णपणे ग्रामसभा यांना वेळीच रक्कम देण्यात आली. ग्रामसभा पेठा यांचे नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्याने तेंदूपत्याची विक्री केली आहे. त्याचप्रमाणे गोविंदगाव येथील तेंदूपत्याची विक्री करायची असल्याने ग्रामसभा गोविंदगाव यांना तेंदूपत्ता तोडायची मजूरी पुर्ण दिल्याने ग्रामपंचायत ने नाहकरत प्रमाणपत्र मला दिले. त्यानंतर तेंदूपत्ता वाहतूक करणेकरीता वाहतूक परवाना लागत असल्याने मी उपवनसरंक्षक कार्यालय सिरोंचा येथे चौकशी केली असता त्यांनी वाहन परवाना करीता पंचायत समिती अहेरी येथील बिडीओ चन्नावार साहेब यांचे सुध्दा नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे, अशी माहिती मिळाल्याने मी दि. 03/08/2023 रोजी दुपारी 12 ते 1 वा. दरम्यान नाहरकत प्रमाणपत्राकरीता पंचायत समिती अहेरी येथे जावून पेसा समन्वयक अधिकारी श्री. संजय कोठारी यांना भेटलो. तेव्हा त्यांनी ''बिडीओ चन्नावार साहेब यांचेकडून नाहरकत प्रमाणपत्र बनवून देतो, बिडीओ चन्नावार साहेब नाहरकत प्रमाणपत्रावर फुकट सही करत नाही, त्याला पण पैसे द्यावे लागतात तरी तु मला 1,30,000/- रूपये दे, मी सर्व बघून घेईन'' यावर मी त्यांना ''एवढी रक्कम सध्या माझेजवळ नाही'' असे सांगितले असता श्री. संजय कोठारी यांनी 50,000/-रू. आजच रात्रौपर्यंत घरी आणून दे, नाहीतर मी तुमचे ग्रामसेवकाकडून कागदपत्रे मागवून घेणार नाही असे म्हणाल्याने मी घाबरून माझी इच्छा नसतांना त्याच दिवशी रात्रौ 8 वा. दरम्यान माझा मित्र राहुल अलोणे यांचेसोबत श्री. संजय कोठारी यांचे घरी जावून त्यांना 50,000/-रू. दिले. त्यावेळी श्री. संजय कोठारी यांनी मला मित्र राहुल अलोणे यांचे समक्ष ''50,000/-रू. मिळाले आता 80,000/-रू. बाकी राहिले परंतु तुमचे ग्रामपंचायतीने 20 लाखाची रायल्टी माफ केली आहे, त्याचे 50,000/-रू. वेगळे वाढवून दया, असे म्हणून मला एकूण 1,30,000/-रू. दया, नाहीतर मी तुम्हाला नाहरकत प्रमाणपत्र बनवून देणार नाही. असे म्हणाल्याने मी पैशाची व्यवस्था करून आपणांस भेटतो असे म्हटले. तेव्हा त्यांनी ठिक आहे, शुक्रवार दि. 18/08/2023 रोजी पंचायत समिती कार्यालय अहेरी येथे 1,30,000/-रूपये घेवून ये '' असे म्हणून मला पैशाची मागणी केली.श्री.

संजय कोठारी, पेसा समन्वयक अधिकारी, पंचायत समिती अहेरी यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन अथवा भांडण नाही तसेच कोणतीही आर्थीक देवाणघेवाणचे व्यवहार नाहीत परंतु श्री. संजय कोठारी, पेसा समन्वयक अधिकारी, पंचायत समिती अहेरी यांनी मला नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता 1,30,000/- रु मागणी केली असून त्यांना रुपये 1,30,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द मी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.
त्यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी सुध्दा स्वाक्षरी केली.त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले.
यानंतर दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबीची नवीन मेमरी कार्ड टाकुन वेळ 15.15 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवून मला व पंच क्र. 1 श्री दिनेश मलगाम असे दोघांना संजिव कोठारी, तालुका पेसा समन्वयक यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पंचायत समिती कार्यालय अहेरी येथे पाठविण्यात आले. पडताळणी वरून आल्यावर व्हॉईस रेकॉर्डर 16.01 वा. बंद करून श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतले. यानंतर श्री. श्रीधर भोसले , पोलीस निरीक्षक यांनी पंच क्र. 1 व मला संजिव कोठारी यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकले व संभाषणाची मॅन्युस्क्रिप्ट तयार केली. यावरून संजिव कोठारी यांची मला शिल्लक राहिलेली लाच रक्कम 80,000/-रू. व्यतीरिक्त वाढीव लाच रक्कम 50,000/- रू. असे मिळून 1,30,000/- रु. लाचेची मागणी असल्याचे स्पष्ट दिसून आले.यानंतर श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी संभाषणाच्या फाईलची हॅशव्हॅल्यु काढून मेमरी कार्ड प्लास्टीक पाऊच मध्ये ठेवून सदर पाऊच एका लिफाफ्यात ठेवून त्यावर दोन्ही पंचांनी व श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी सही करून लिफापा लाखेने सिलबंद केला. याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे. यानंतर दि. 22/08/2023 रोजी पंचनामा क्र.2 नुसार कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान लाच रक्कम 500/- रु. दराच्या 260 नोटा असे एकुण 1,30,000/- रुपये हजर केले असता त्या नोटांचे क्रमांक पंच क्र 1 श्री. दिनेश मलगाम यांनी वाचले व पंच क्र. 2 श्री.कैलास मातने यांनी पडताळुन पाहिल्यावर नोटांचे क्रमांक पंचनाम्यात नमुद केले. त्यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांचे सूचनेवरून पोहवा नथ्थु धोटे यांनी सदर नोटांना अँथ्रॉसिन पावडर लावणार येणार असल्याचे सांगून त्याचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॉसिन पावडर लावून सदर रक्कम एका लिफाप्यात ठेवले. यानंतर दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. यानंतर मला व पंच क्र. 1 यांना सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबी ची नवीन मेमरी कार्ड टाकुन वेळ 15.21 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवून श्री. चन्नावार प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहेरी यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पंचायत समिती कार्यालय अहेरी येथे पाठविण्यात आले. बिडीओ साहेबांशी प्रत्यक्ष लाच मागणी संदर्भात बोलणी झाली नाही. परंतु संजिव कोठारी, तालुका पेसा समन्वयक यांचेशी अचानक भेट झाल्याने त्यांचेशी लाच मागणी संदर्भात पुन्हा एकदा सविस्तर बोलणी झाली. सदर बोलणीमध्ये यापुर्वी 50,000/-रू. लाच रक्कम स्विकारल्याचे संजिव कोठारी यांनी कबूल केले तसेच उर्वरीत लाच रक्कम 1,30,000/-रू. स्विकारण्याची तयारी दर्शविली. पडताळणी वरून आल्यावर व्हॉईस रेकॉर्डर 19.08 वा. बंद करून श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतले. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकॉर्डर मधले संभाषण ऐकले व संभाषणाची मॅन्युस्क्रिप्ट तयार केली. यावरून संजिव कोठारी यांची मला शिल्लक राहिलेली लाच रक्कम 80,000/-रू. व्यतीरिक्त वाढीव लाच रक्कम 50,000/-रू. असे मिळून एकूण 1,30,000/- रु. लाचेची मागणी असल्याचे स्पष्ट दिसून आले. यानंतर श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी संभाषणाच्या फाईलची हॅशव्हॅल्यु काढून मेमरी कार्ड प्लास्टीक पाऊच मध्ये ठेवून सदर पाऊच एका लिफाफ्यात ठेवून त्यावर दोन्ही पंचांनी व श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी सही करून लिफापा लाखेने सिलबंद केला. याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये नमुद आहे.यानंतर दि. 23/08/2023 रोजी पंचनामा क्र. 3 नुसार कारवाई करण्यात आली. परंतु सदर दिवशी बिडीओ चन्नावार कार्यालयात हजर नसल्याने पडताळणी कार्यवाही होवू शकली नाही. याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 3 मध्ये नमुद आहे. यानंतर दि. 24/08/2023 रोजी पंचनामा क्र. 4 नुसार कारवाई करण्यात आली. यानंतर मला व पंच क्र. 1 दोघांना सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर

मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबी ची नवीन मेमरी कार्ड टाकुन वेळ 18.17 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डींग मोडवर ठेवून मला व पंच क्र. 1 श्री दिनेश मलगाम असे दोघांना चन्नावार बिडीओ यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पंचायत समिति कार्यालय अहेरी येथे पाठविण्यात आले. चन्नावार बिडीओ हे त्यांचे कार्यालयात बसून होते. मी त्यांचे कक्षात जावून खुर्चीवर बसलो. त्यानंतर बिडीओ साहेबांनी मला अर्ज लिहायला सांगितला व सदर अर्जात तक्रारीशी माझा काही संबंध नाही तो कॉन्ट्रॅक्टर वेगळा व मी कॉन्स्ट्रॅक्टर वेगळा असे काहीतरी अर्जात लिहायला सांगितले. यानंतर बिडीओ साहेबांनी मला हाताने पैशासंदर्भात ईशारा करून तुम्ही तिकडे करून टाका असे म्हटले. यावर पैशासंदर्भात बिडीओ साहेबांना म्हटले की, सर कोठारी साहेबांना सांगा थोडा जास्त होत आहे, तेव्हा बिडीओ साहेब म्हणाले की, हे त्यांनी नाही सांगितले हे मीच सांगत आहे यावर मी नाही नाही जास्त होते असे म्हटले परंतू त्यांनी पुढे बोलायचे टाळून मला 10-15 मिनीटांनी या म्हटले. म्हणून मी बाहेर वाट पाहत थांबलो असता त्यांचे कर्मचार्यांनी बाहेर येवून मला उद्या या असे म्हटले. अशाप्रकारे पडताळणी वरून आल्यावर व्हॉईस रेकॉर्डर 19.45 वा. बंद करून श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतले. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी पंच क्र. 1 व मला बिडीओ चन्नावार साहेब यांचेसोबत झालेल्या संभाषणा बाबत विचारणा केली. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकले व संभाषणाची मॅन्युस्क्रिप्ट तयार केली. यावरून बिडीओ चन्नावार साहेबांची मला लाचेची मागणी असल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले. यानंतर श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी संभाशणाच्या फाईलची हॅशव्हॅल्यु काढून मेमरी कार्ड प्लास्टीक पाऊच मध्ये ठेवून सदर पाऊच एका लिफाफ्यात ठेवून त्यावर दोन्ही पंचांनी व श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी सही करून लिफापा लाखेने सिलबंद केला. याबाबत सविस्तर नोदी पंचनामा क्र. 4 मध्ये नमुद आहे. यानंतर दि. 25/08/2023 रोजी पंचनामा क्र. 5 प्रमाणे कारवाई करण्यात आली. यानंतर मला व पंच क्र. 1 दोघांना सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबीची नवीन मेमरी कार्ड टाकुन वेळ 09.45 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डींग मोडवर ठेवून मला व पंच क्र. 1 श्री दिनेश मलगाम असे दोघांना चन्नावार बिडीओ यांचेकडे त्यांची भेट घेण्यास व लाच रक्कम कमी करण्याची विनंती करण्यासाठी ते थांबून असलेल्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह अहेरी येथे पाठविण्यात आले. भेटीमध्ये मी बिडीओ चन्नावार साहेबांना लाच रक्कम संदर्भात कुछ तो भी कम करने को बताओ, अशी विनंती केली असता त्यांनी बोलता हू, मिलता हू असे बोलून लाच रक्कम कमी करण्याविषयी जास्ती बोलण्याचे टाळले व मला ऑफीसमध्ये बोलाविले. अशाप्रकारे बोलणी करून आल्यावर व्हॉईस रेकॉर्डर 10.30 वा. बंद करून श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतले. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी माझी अंगझडती घेवुन मला व पंच क्र. 1 असे दोघांना सूचना देवून लाच रक्कम 1,30,000/-रू. माझे कुर्त्याचे खालील उजव्या बाजूचे खिशात ठेवली व लाच रक्कम देण्या देण्याकरीता आम्हा दोघांना कार्यालय पंचायत समिती येथे रवाना केले. रवाना करतेवेळी वेळ 17.05 वा.व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डींग मोडवर ठेवून माझे बनियानचे आतमध्ये लटकवून ठेवले. कार्यालय पंचायत समिती अहेरी येथे गेल्यावर बिडीओ चन्नावार साहेब हजर नव्हते. परंतु संजिव कोठारी, तालुका पेसा समन्वयक यांची भेट झाली. त्यावेळी त्यांनी मला त्यांच्या साळा नामे अनिल बुधाजी गोवर्धन यांचेसोबत बाहेर जावून त्याचेजवळ लाच रक्कम द्यायला सांगितल्यामुळे मी अनिल गोवर्धन यांच्या मोटारसायकलवर बसून कार्यालयाबाहेर गेलो. थोडे अंतर गेल्यावर अनिल गोवर्धन यांनी माझेकडून 17.50 मिनीटांनी लाच रक्कम 1,30,000/-रू.उजव्या हाताने स्विकारून त्याचेकडील लॅपटॉपच्या बॅगमध्ये ठेवले. यानंतर अनिल गोवर्धन यांनी मला लगेच परत कार्यालय पंचायत समितीच्या गेटवर आणून सोडले व तात्काळ निघून गेला. यानंतर मी लाच स्विकारल्याचा नियोजित ईशारा केल्यावर श्री. श्रीधर भोसले व सापळा पार्टीतील सदस्य माझेजवळ आले व वेळ 17.53 वा. व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. यावेळी मी त्यांना थोडक्यात हकिकत सांगितल्यावर त्यांनी मला व पंच क्र.1 तसेच सापळा पार्टीतील सदस्यांना सोबत घेउन शोधाशोध केली असता अनिल गोवर्धन हॉकी ग्राउंड अहेरी येथे मिळून आल्यावर त्यास ताब्यात घेउन आम्ही सर्व पोलीस स्टेशन अहेरी येथे आलो.त्याचेकडून लाच रक्कम 1,30,000/-रू. जप्त केली. अनिल गोवर्धन याची लॅपटॉप बॅग सुध्दा जप्त केली.तसेच गुन्हयातील हिरो स्प्लेंडर मोटर सायकल क्रं MH34BC6480 जप्ती प्रमाणे जप्त करण्यात आली तसेच श्री श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी अनिल गोवर्धन व माझी अंगझडती घेतली. यानंतर श्री. श्रीधर भोसले,पोलीस निरीक्षक यांनी पंच क्र.1 व मला संजिव कोठारी तसेच अनिल गोवर्धन यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली.यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकले व संभाषणाची मॅन्युस्क्रिप्ट तयार केली. यानंतर श्रीधर भोसले,पोलीस निरीक्षक यांनी संभाषणाच्या फाईलची हॅशव्हॅल्यु काढून मेमरी कार्ड प्लास्टीक पाऊच मध्ये ठेवून सदर पाऊच एका लिफाफ्यात ठेवून त्यावर दोन्ही पंचांनी व श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी सही करून लिफापा लाखेने सिलबंद केला. तसेच संजिव कोठारी यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्रबाबत संबधीत कागदपत्र पंचासमक्ष जप्त करण्यात आले.याबाबत

सविस्तर नोंदी पंचनामा क्र.5 मध्ये नमुद आहे. तरी आरोपी क्र.1 प्रतिक दिवाकर चन्नावार, प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहेरी व आरोपी क्र. 2 संजिव येल्ला कोठारी, तालुका पेसा समन्वयक पंचायत समिती अहेरी यांनी तक्रारदार यांना सन 2022 मध्ये मौजा गोविंदगाव येथील तेंदूपत्ता युनिट लिलावात घेवून सदर तेंदूपत्याचे वाहतुक परवान्याकरीता गटविकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांचे नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने ते देण्याच्या कामाकरीता आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून 1,30,000/- (एक लाख तिस हजार रूपये ) लाच रक्कमेची मागणी करून आरोपी क्र.2 यांचे सांगणेवरून आरोपी क्र.3 श्री.अनिल बुधाजी गोवर्धन वय 30 वर्षे रा.व्यंकटापूर ता. अहेरी जि. गडचिरोली यांच्या हस्ते माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

MANOJ KRISHNAJI KALBANDE(I (Inspector)) / BORBN75050 **or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, अंधेरी

पोलीस निरिक्षक
पोलीस स्टेशन अंधेरी

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** MANOJ KRISHNAJI KA
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** POBN75050

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**